सकाळ

पुणे। कोल्हापूर। नाशिक। मुंबई। औरंगाबाद। सोलापूर। नागपूर। सातारा। जळगाव। नांदेड। अकोला येथून प्रसिद्ध

सातारा

सकाळ

सातारा, मंगळवार, २ ऑगस्ट २०१६

३

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# डी. पी.'त विद्यार्थिनी सुरक्षा समितीची स्थाप

## छाड, हुल्लडबाजांविरोधात बजावणार दबावाची भूमिका; तिघा युवकांवर प्रतिबंधात्मक क

**कोरेगाव, ता. १ :** येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात विद्यार्थिनी सुरक्षा समितीची स्थापना झाली आहे. युवतींची छेडछाड व हुल्लडबाजांविरोधात सामाजिक दबाव निर्माण करण्याची भूमिका ही समिती बजावणार आहे.

महाविद्यालयातील काही मुलींची छेडछाड झाल्याचे व या प्रकरणात महाविद्यालयाशी संबंध नसलेल्या शहरातीलच काही हुल्लडबाजांचा सहभाग असल्याचे स्पष्ट झाले होते. या संवेदनशील विषयासंदर्भात 'सकाळ'ने सकारात्मक बातम्यांच्या माध्यमातून पाठपुरावा सुरू ठेवला. परिणामी महाविद्यालय व पोलिस यंत्रणेने हा विषय गांभीर्याने घेउन हुल्लडबाजांवर कारवाईचे सत्र सुरू झाले. मद्य व धूम्रपान करत विनापरवाना भरधाव दुचाकीवर महाविद्यालय परिसरात जाऊन प्राध्यापक व वॉचमनला शिवीगाळ करणाऱ्या तिघा युवकांवर कोरेगाव पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई केली. स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांपुढे संबंधितांना उभे करून त्यांच्याकडून चांगल्या वर्तणुकीची हमी घेतली आहे. त्यांना सोमवारी पोलिस ठाण्यात हजेरी देण्यास

**स बातमीचा परिणाम**

बजावले आहे. एवढ्यावरच न थांबता पोलिसांनी त्यानंतर सलग काही दिवस महाविद्यालय परिसरात पाळत ठेवली. जोरात हॉर्न वाजवत विनापरवाना व भरधाव ट्रीपल सीट दुचाकी चालवून हुल्लडबाजी करणाऱ्या शहरातील अनेकांवर मुंबई पोलिस ॲक्ट व मोटार व्हेईकल ॲक्टखाली कारवाई करून संबंधितांकडून दंडही वसूल केला. युवतींच्या छेडछाडीचे प्रकरण पुढे आल्यानंतर महाविद्यालयाने शहरातील प्रमुख नागरिकांची बैठक बोलावली होती. युवतींना निर्भयपणे व मोकळेपणाने म्हणणे मांडता यावे, यासाठी महिलांचा समावेश असलेली एक समिती महाविद्यालय स्तरावर स्थापन करण्याचे बैठकीत ठरले होते. त्यानुसार, प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली १८ सदस्यांची विद्यार्थिनी सुरक्षा समिती स्थापन झाली आहे. त्यात पोलिस निरीक्षक, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, महाविद्यालयातील महिला प्राध्यापक, जिल्हा परिषदेच्या सदस्या अर्चना बर्गे, माजी उपसरपंच प्रतिभा बर्गे, माजी सदस्या डॉ. मनीषा होळ, ॲड. वृषाली बगाडे आदी प्रमुखांचा समावेश आहे.

**अत्यंत संवेदनशील असलेला युवतींच्या छेडछाडीचा प्रश्न 'सकाळ'ने सकारात्मकपणे हाताळला. त्यामुळे या प्रश्नासंदर्भात महाविद्यालय स्तरावर काही निर्णय घेण्यास मार्गदर्शन मिळाले. त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयामध्ये विद्यार्थिनी सुरक्षा समिती स्थापन झाली आहे.**

**- प्रा. डॉ. विजयसिंह सावंत,**